स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पीएच.डी. (मराठी) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाची प्राथमिक रुपरेषा

- विषय -

"मराठी कादंबऱ्यावरील रुपांतरीत नाटकांचा विवेचक अभ्यास" विशेष संदर्भ : मृत्युंजय, झुलवा, निशानी डावा अंगठा, मी नथुराम गोंडसे बोलतोय, थँक यु मिस्टर ग्लॉड

संशोधक विद्यार्थी

रामदास संभाजी जोंधळे

एम.ए. (मराठी), नेट

संशोधन मार्गदर्शक

डॉ.लक्ष्मण सोमला पवार

सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

ता.हिमायतनगर जि.नांदेड

2024

"मराठी कादंबऱ्यावरील रुपांतरीत नाटकांचा विवेचक अभ्यास" विशेष संदर्भ : मृत्युंजय, झुलवा, निशानी डावा अंगठा, मी नथुराम गोंडसे बोलतोय, थँक यु मिस्टर ग्लॉड

प्रस्तावना :

लेखक समाजात जीवन जगतांना ज्या घटना, प्रसंग, व्यक्ती यांचा त्यांच्यामनावर तो परिणाम होतो. त्यातून त्याला जे जिवनाचे सत्य सापडते, ते तो साहित्यात अभिव्यक्त करत असतो. साहित्यात लेखकच व्यक्त होतो. पर्यायाने तो जिवनानुभव मांडत असतो. जीवन अनुभव मांडत असतांना लेखक वाङ्मयाच्या विविध साहित्य प्रकाराचा आधार घेत असतो.

जसे कथा, कादंबरी, नाटक, कविता, ललित इ.

अशा विविध वाङ्मय प्रकारात लेखक स्वतःचे अनुभव व्यक्त करतोच. त्याच प्रसंगी त्यांचा स्व अनुभव हा त्याचा न राहता तो संपुर्ण विश्वाचा बनतो.

वाङ्मयात विविध साहित्याचे प्रकार आहेत. तरीही प्रत्येक प्रकाराचे स्वतःचे एक स्थान, मुल्य, संहीता असते.

जे की, कथा, कादंबरी, लघुकथा, नाटक

मराठी वाङ्मय प्रवाहात काही लेखकांनी एकच अनुभव विविध साहित्य प्रकारात मांडण्याचा प्रयोग केला आहे.

उदा.

गुरुमहात्मे - संत ज्ञानेश्वर - ज्ञानेश्वरी १६ वा अध्याय

गुरुमहात्मे - संत ज्ञानेश्वर - हरिपाठात

लेखकाने एकच अनुभव विविध किंवा एका पेक्षा दोन साहित्य प्रकारात मांडल्याने लेखकाच्या अनुभवात बदल न होता, तो बदल आत्मविष्कार, अभिव्यक्तीत, मुल्यांत, संहितेत बदल असतो.

मराठी साहित्याचा विचार करता विविध अशा वाङ्मय प्रकारात कलाकृतीतून लेखकाचा स्वतःचा असा वेगळा ठसा उमटवलेला आहे.

उदा.

भालचंद्र नेमाडे - कादंबरीकर

मंगेश पाडगांवकर - कवी

मराठी वाङ्मय प्रवाहात काही लेखकांनी एकच अनुभव दोन वाङ्मय प्रकारात व्यक्त केला आहे. दोन वाङ्मय प्रकारातून व्यक्त होतांना सुध्दा लेखकाने त्या - त्या साहित्य प्रकाराची मुल्ये, आस्वादकता जपण्याचा प्रयत्न केला आहे.

उदा.

छावा - कादंबरी - शिवाजी सावंत

छावा - नाटक - शिवाजी सावंत

या संशोधन प्रबंधनासाठी मुलतः कादंबरी रुपांतरीत नाटक या साहित्य प्रकाराच्या बदलाचा अभ्यास करावयाचा आहे.

कादंबरी हा वाङ्मय प्रकार जन्मला असला तरी, त्याचे बिज हे कथेत सापडते. गोष्ट सांगणे व ऐकने यातून कथा, कादंबरीचा विकास झालेला दिसतो.

कादंबरी हा वाङ्मय प्रकार व्यापक असा आहे. एक मुख्य घटना, अनेक उपघटना एक मुख्य पात्र, इतर अनेक सहपात्र खलनायक किंवा खल सदृश्य परिस्थिती असते. तसेच भाषा, वातावरण, भौगोलीक परिस्थिती, संघर्ष असे महत्वाचे घटक असतात आणि त्यातूनच कादंबरी फुलत जाते, विकास पावत जाते. कादंबरीतील कथानक पुढे चालवण्यासाठी निवेदन तर कधी आत्मनिवेदन लेखक करीत असतो.

उदा.

भालचंद्र नेमाडे	-	कोसला	-	आत्मनिवेदन
उध्दव शेळके	-	धग	-	निवेदन

हरिभाऊंच्या 'मधली स्थिती' या किंवा बाबा पद्मनजीच्या 'यमुना पर्यटन' पासून ते आजच्या भालचंद्र नेमाडेच्या हिंदू कादंबरीपर्यंत कादंबरीचा विकास झाला आहे आणि होत आहे.

एखादा लेखक स्वतःची कादंबरी प्रचंड यशस्वी झाल्यावर ती कलाकृती रंगमंचावर आणण्याचा प्रयत्न करतो. कारण की, कादंबरी हा वाङ्मय प्रकार एकावेळी एकच वाचक वाचू शकतो. मात्र नाटकाचा एकाच वेळी हजारो प्रेक्षक आस्वाद घेवू शकतात. तेंव्हा काही कादंबरी लेखकांनी आपण कादंबरीत व्यक्त केलेला जीवन अनुभव नाटकातून व्यक्त केलेला

दिसून येतो. या मागची भुमिका ही की, आपल्याला सापडलेले जीवनानुभव सत्य, एकाच वेळी हजारो प्रेक्षकांपुढे पात्रांच्या, रंगमंचाच्या माध्यमातून जिवंत साकारावे हे असते. म्हणून लोक आपली कलाकृती रंगमंचावर आणतो. तेंव्हा कादंबरीत व्यक्त झालेला अनुभव तसाच नाटकातून जशाच तसा व्यक्त करता येत नाही. कारण की, नाटक हा मुलतः दृकश्राव्य कलाप्रकार आहे. तसेच नाटकाचे सादीकरण महत्वाचे असते. नाटकात संवाद महत्वाचे असतात.

नाटकाचे यश केवळ संहिता चांगली आहे म्हणून चालत नाही तर नट, दिग्दर्शक, नेपथ्य, संवादच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या मनावर किती परिणाम होतो यावर नाटकाचे यश अवलंबुन असते.

नाटकाची संहिता म्हणजे, विषय, अनुभव, याचा टप्प्या - टप्प्याने होणारा विकास होय.

कथानकाचे पात्राच्या सहाय्याने नाटकात विकास पाहायला मिळतो आणि संवाद हा नाटकाचा प्राण असतो. पात्राच्या मनातील भाव-भावना, विचार, संवादातून प्रेक्षकापर्यंत पोहोचतात आणि म्हणूनच लेखकाला कादंबरीचे नाटकात रुपांतर करतांना काही मर्यादा येतात. वातावरण, घटना, प्रसंग, कथानकाचा विकास, भौगोलीक परिस्थिती, पात्र, याला मर्यादा येतात. तसेच एक महत्वाची मर्यादा म्हणजे कादंबरीतील अनुभवाचे निवेदन ही होय.

मराठी वाङ्मय प्रवाहात काही लेखकांनी कादंबरीचे नाटकात रुपांतर केलेले आहे. यात, पु.ल.देशपांडे, गो.नी.दांडेकर, रा.र.बोराडे, अनिल बर्वे, शिवाजी सावंत, जयवंत दळवी, श्री.ना.पेंडसे, श्रीनिवास जोशी, राजु नाईक इत्यादींनी केले आहे.

कादंबरी रुपांतरीत नाटक हा चिंतनाचा विषय आहे. म्हणूनच संशोधनाचा उद्देश समोर ठेवून हा विषय निवडला आहे.

कादंबरीतून नाटकात रुपांतर करतांना लेखकाला यश, अपयश मिळाले आहे. तसेच त्याचे वेगळेपण वाचकाच्या, प्रेक्षकांच्या मनावर होणारा परिणाम, अविष्कारातील बदल हा सर्व संशोधनाचा विषय आहे.

विद्यापीठीय संशोधन करतांना अभ्यासाची चौकट समोर ठेवून हे संशोधन केले जात आहे. म्हणूनच अशा काही पाच कादंबरीत लेखक ज्यांनी कादंबरीच्या अनुभवाचे रुपांतर नाटकात केले आहे, अशा पाच लेखकाचा व त्याच्या नाट्यकृतींचा अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

'कादंबरी रुपांतरीत नाटक' या विषयाचा प्रबंध आराखडा खालीलप्रमाणे केलेला आहे. गरजेप्रमाणे यात काही बदल होण्याचा संभव आहे.

प्रबंध लेखनाचा हेतु :

नाटक हा दृक-श्राव्य कला प्रकार आहे. नाटकात वास्तवाचा अभ्यास निर्माण केलेला असतो. संवाद हा नाटकाचा प्राण समजला जातो. तसेच पात्राची योजना, संगीत, नेपत्य याचेही नाटकाच्या यशस्वीतेसाठी योजन केलेले असते तर कथानक हे नाटकाचा बिंदु मानला जातो आणि नाटककार सादीकरण हा हेतु मनात ठेवून नाटक लिहित असतो.

'बुकीश' नाटकाची परंपरा ही नाट्य चळवळीला असली तरी कादंबरी रुपांतरीत नाटक हा प्रयोग अलीकडचा आहे. कादंबरीतून नाटकात रुपांतर केल्यावर होणारे बदल, यश, अपयश, अविष्कारातील बदल, संवादपात्र, दिग्दर्शनातील अभिव्यक्ती, लेखकाचा अनुभव

बदल याचा सखोल अभ्यास करण्यासाठी 'कादंबरी रुपांतरीत नाटक' हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधन पध्दत व साधने :

कादंबरी रुपांतरीत नाटकाचा विवेचक अभ्यास हा प्रबंध लेखनाचा विषय आहे. त्यासाठी एक अभ्यासपुर्वक शोधप्रबंध साकारण्यासाठी विविध लेखकाचे -

१. कादंबरी रुपांतरीत नाटक, संहिता.

२. समिक्षा ग्रंथ

३. विश्वकोष

४. वृत्तपत्रीय समिक्षा

५. ग्रंथालयीन साधने

६. सुक्ष्म संहिता चिकित्सा, आस्वादक समिक्षा, तौलोनिक समिक्षा, मानसशास्त्रीय समिक्षा, विश्लेषणात्मक पध्दती, समिक्षा पध्दतींचा अवलंब तसेच मुलाखती, भेट, क्षेत्रीय अभ्यास पध्दतीचा विषयानुसार करुन हा शोध प्रबंध पुर्ण करण्यात येईल.

प्रबंधाचा प्रकरणनिहाय आराखडा :

प्रकरण पहिले : मराठी कादंबरी

व्याख्या

स्वरुप

वेगळेपण

प्रवाह

प्रकरण दुसरे : मराठी नाटक

व्याख्या

स्वरुप

वेगळेपण

प्रकरण तिसरे : मराठी कादंबरीचे नाट्य रुपांतर आणि नाट्य रुपांतराचा प्रवास

१९४५ - १९६०

१९६० - १९८०

१९८० - २०१०

प्रकरण चौथे : संशोधनासाठी घेतलेले कादंबरी रुपांतरीत नाटक (पाच लेखक)

१.	शिवाजी सावंत	:	मृत्युंजय
२.	चेतन दातार (उत्तम बंडु तुप्पे) (कादंबरीकार)	:	झुलवा
३.	श्री.मंगेश बनसोडे रमेश इंगळे उन्नादकर (कादंबरीकार)	:	निशानी डावा अंगठा
४.	प्रदिप दळवी गोपाळ गोंडसे (कादंबरीकार)	:	मी नथुराम गोंडसे बोलतोय
५.	अनिल बर्वे	:	थँक यु मिस्टर ग्लॉड

प्रकरण पाचवे : कादंबरी - विषय - वेगळेपणा - यश

प्रकरण सहावे : नाट्यरुपांतर - कालखंड - बदल - यश - प्रयोग पुरस्कार

प्रकरण सातवे : निष्कर्ष

परिशिष्ट्ये :

- **लेखकाच्या मुलाखती**
- **दिग्दर्शकांच्या व नटांच्या मुलाखती**

संदर्भ ग्रंथ :

संदर्भ ग्रंथ

१. कानेटकर वसंत - नाटक, एक चिंतन

२. काळे के.ना. - नाट्य विमर्ष

३. कुलकर्णी अ.वा. - मराठी नाट्यलेखन तंत्राची वाटचाल

४. कुलकर्णी द.भि. - नाट्यवेध

५. गोकाकार एस.जी. - शोकनाट्याची मुलतत्वे

६. बनहट्टी श्री.ना. - मराठी नाट्कला आणि नाट्य वाड्.मय

७. सावंत कृ.रा. - रंगचर्या

८. कानडे मु.श्री. - नाट्यशोध

९. संपा. डॉ.वि.भा.देशपांडे - नाट्यकोश

१०.	डॉ.रुस्तुम आचलखांब	-	रंगबाजी
११.	प्रा.यशंवत केळकर	-	नाट्य निर्मिती
१२.	डॉ.प्रकाश मेदककर	-	सामाजिक नाटक : स्वरुप विचार
१३.	गो.म.कुलकर्णी	-	मराठी नाट्यसृष्टी

संशोधक विद्यार्थी
प्रा.रामदास संभाजी जोंधळे
एम.ए. (मराठी) नेट

मार्गदर्शक
डॉ.लक्ष्मण सोमला पवार
सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर
ता.हिमायतनगर जि.नांदेड

■■■